गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष २ रे ● अंक ०९ वा ● रविवार २६ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 09 | Date : 26/05/2024 blow Sunday Page 4 Price 4

## उद्या दहावीचा निकाल जाहीर होणार

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या निकालाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी या संदर्भातील घोषणा परिपत्रकाद्वारे केली. त्यानुसार येत्या सोमवारी म्हणजेच २७ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची निकालाबाबतची उत्सुकता आता संपुष्टात येणार आहे.

बारावीचा निकाल २१ मे रोजी जाहीर करण्यात आला होता. त्याच दिवशी दहावीचा निकाल २७ मे रोजी जाहीर होणार असल्याची चर्चा होती. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थी दुपारी एक वाजल्यापासून ऑनलाइन निकाल पाहू शकतात. https://mahresult.nic.in, http://sscresult.mkcl.org, https://sscresult.mahahsscboard.in, https://results.digilocker.gov.in, https://results.targetpublications.org या संकेतस्थळांद्वारे निकाल पाहता येणार आहे.




ऑनलाइन निकालानंतर दहावीच्या परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (http://verification.mhassc.ac.in) स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करता येईल. गुणपडताळणी आणि छायाप्रतीसाठी २८ मे ते ११ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करून शुल्क भरता येईल.

मार्च २०२४ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन । **पान २ वर**

## राज्यातील ७४३ शेतकऱ्यांमध्ये ‘सलोखा’; मुद्रांक, नोंदणी शुल्कात ६.६० कोटींची माफी

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शेतजमिनीचा ताबा, वहिवाटीबाबत शेतकऱ्यांमधील आपसातील वाद मिटविण्यासाठी शासनाने सलोखा योजना आणली आहे. एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे, दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीन धारकांचे दस्तांच्या अदलाबदलीसाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कात सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत ७४३ दस्त नोंद झाले असून, तब्बल ६.६० कोटी रुपयांचे मुद्रांक आणि नोंदणी शुल्कात सवलत देण्यात आली आहे.

महाराष्ट्रामध्ये किंबहुना देशामध्ये जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यतः मालकी हक्क, शेताचा बांध, जमिनीचा ताबा, रस्ता, शेतजमीन मोजणी, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदी, शेतीवरील अतिक्रमण, शेत वहिवाट, भावा-भावांतील वाटणी, शासकीय योजनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यता आदी कारणांमुळे शेतजमिनीचे वाद आहेत. हे वाद अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे । **पान २ वर**

## केरळमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा कहर; दोन जिल्ह्यांना रेड अलर्ट

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

मोसमी पाऊस ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवलेला आहे. मोसमी वाऱ्याच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती असल्यामुळे मोसमी पाऊस केरळमध्ये वेळेत दाखल होणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने काही दिवसांपूर्वी म्हटले होते. त्यानंतर आता केरळमध्ये मान्सूनपूर्व पाऊस दाखल झाला असून पावसामुळे अनेक सेवा विस्कळीत झाल्या आहेत. तसेच केरळमधील दोन जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दक्षिण केरळवरील चक्रीवादळाच्या प्रभावाखाली केरळच्या किनारपट्टीपासून दक्षिणपूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने आयएमडीने पुढील दोन दिवस केरळमध्ये अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवलेला आहे. केरळच्या अनेक भागात बुधवारी रात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. मान्सूनला अजून एक आठवडा बाकी आहे. मात्र, त्याआधीच केरळच्या अनेक भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. एर्नाकुलम आणि त्रिशूर जिल्ह्यांमध्ये बुधवारी रात्रीपासून पावसाने थैमान घातले आहे. केरळच्या इतर आठ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिलं आहे.



दिल्लीसह संपूर्ण उत्तर भारत उष्णतेचा सामना करत आहे. दक्षिण भारतात मात्र हवामान थंड झाले आहे. केरळमध्ये मान्सूनपूर्व पाऊस सक्रीय झाला आहे. २३ मे रोजीच्या आयएमडी डेटावरून असे दिसून आले की, गेल्या काही दिवसांतील अतिवृष्टीमुळे संपूर्ण राज्यात सामान्य पावसाचे प्रमाण वाढले आहे.

केरळमध्ये पाऊस सुरू असल्याने केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी लोकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. अचानक ढगफुटी किंवा पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. । **पान २ वर**

## दुष्काळ आणि पाणी टंचाईची स्थिती गंभीर; तातडीने उपाययोजना करा

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्याच्या अनेक भागात विशेषत: मराठवाड्यात भीषण पाणी टंचाई आणि दुष्काळी स्थिती आहे. त्या संबंधात राज्य सरकारने तातडीने काही उपाययोजना हाती घेतली पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. पवार यांनी पाणी टंचाईने ग्रस्त असलेले जिल्हे आणि गावे तसेच तेथील सध्याच्या टँकरची स्थिती आदी बाबींवर विस्तृत भाष्य करताना राज्य सरकारकडे सात प्रमुख मागण्या केल्या आहेत. जुलैच्या अखेरीपर्यंत पाण्याची टंचाई कायम राहणार आहे. त्यामुळे मराठवाडा आणि अन्य ठिकाणी तातडीने पाण्याचे वाढीव टँकर पुरवले जावेत. राज्यातील शेतकऱ्यांनी पीकविमा काढला आहे, पण त्यांचे पैसे देण्यास विमा कंपन्या टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे राज्य



सरकारने त्यांच्याशी बोलून शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचा विषय त्वरित मार्गी लावला पाहिजे. टंचाईग्रस्त भागात वीज बिलात सवलत द्यावी, वीज बिल वसुली थांबवावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

वीज बिल भरले नाही म्हणून वीज तोडण्याची कारवाई त्वरित थांबवावी. मनरेगाच्या कामांच्या निकषात शिथिलता आणावी व राज्यात पूर्वी रोजगार हमी योजनेचे जे निकष होते तेच निकष पुन्हा लागू करावेत, दुष्काळग्रस्त भागातील मुलांची शालेय फी माफ करावी, फळबागांचे नुकसान झाल्यानंतर राज्यात नुकसान भरपाई देण्याची पद्धत होती, ती पद्धत पुन्हा लागू करावी, जिथे गंभीर पाणी टंचाई आहे, त्या भागात जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात अशा सात मागण्या त्यांनी राज्य सरकारकडे केल्या असून त्या बाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

## आधी तुमचा देश सांभाळा, पाकिस्तानी नेत्याला अरविंद केजरीवालांनी सुनावले

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्याचे मतदान होत आहे. दिल्लीतील सातही जागांवर आज मतदान होत असून आम आदमी पक्षाचे संयोजक आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कुटुंबासह मतदान केले. यानंतर पाकिस्तानमधील एका नेत्याने त्यांचा फोटो शेअर करत भारतातील निवडणुकांवर भाष्य केले होते. मात्र अरविंद केजरीवाल यांनी या पोस्टर संताप व्यक्त करत पाकिस्तानी नेत्यालाच खडे बोल सुनावले. अरविंद केजरीवाल यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर कुटुंबासह मतदान केल्याचा



फोटो शेअर केला. कॅप्शनमध्ये लिहिले, मी आज वडील, पत्नी आणि मुलांसह मतदान केले. माझी आई आजारी असल्यामुळे ती मतदानासाठी येऊ शकली नाही. मी हुकूमशाही, बेरोजगारी आणि महागाईविरोधात मतदान केले. प्रत्येकाने मतदान केले पाहीजे.

अरविंद केजरीवाल यांचा पोस्टला रिपोस्ट करत पाकिस्तानी नेते आणि माजी मंत्री फवाद हुसैन चौधरी यांनी लिहिले, शांतता आणि सौहार्द हाच द्वेष आणि कट्टरतावादाचा पराभव करू शकेल. तुम्हाला आणखी शक्ती लाभो. या मजकुरात पुढे IndiaElection2024 असा हॅशटॅग देण्यात आला आहे. पाकिस्तानी नेत्याचे कौतुक केजरीवाल यांना फारसे रुचले नाही. पाकिस्तानच्या तेहरीक-ए-इन्साफच्या फवाद हुसैन चौधरी यांच्यावर टीका केली. अरविंद केजरीवाल म्हणाले, चौधरी साहेब, मी आणि माझ्य देशातील । **पान २ वर**

## अशोक सराफ यांना नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने दरवर्षी १४ जून रोजी गो. ब. देवल पुरस्कार समारंभाचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या वर्षी ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते अशोक सराफ व अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. मागील तीन वर्षांपासून पुरस्कारांचे वितरण करण्यात आले नव्हते. नाट्य परिषदेची निवडणूक पार पडताच, कमी वेळात तातडीने नवनिर्वाचित नियामक मंडळाने जीवनगौरव पुरस्कार देण्याचे योजिले व पुरस्कार जाहीर केले. यंदाच्या वर्षी १४ जून २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मुंबई येथे सायंकाळी ४ वाजता सर्व पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली आहे. नाट्य क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या नाट्यकर्मीचा सन्मान नाट्य परिषदेच्यावतीने दरवर्षी केला जातो. यानिमित्ताने कलावंतांचा मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच १०० व्या




नाट्यसंमेलनानिमित्त घेण्यात आलेला ‘नाट्यकलेचा जागर’ यातील सर्वोत्कृष्ट पारितोषिकप्राप्त एकांकिका, बालनाट्य, एकपात्री, नाट्यछटा, नाट्यसंगीत पद गायन, नाट्य अभिवाचन कार्यक्रम यानिमित्ताने सादर होणार आहेत, अशी माहिती दामले यांनी दिली.

## सुनील तटकरे यांचं मोठं विधान; ‘राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लवकरच मोठं इनकमिंग होणार’

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील मतदान आज पार पडले. सातव्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. महाराष्ट्रातील पाचही टप्प्यातील मतदान झालेले आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. मात्र, लोकसभा निवडणूक संपत नाही तोच राजकीय पक्ष महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची २७ मे रोजी मुंबईत महत्वाची बैठक बोलावण्यात आली असल्याची माहिती खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात लवकरच मोठं इनकमिंग होणार असल्याचं सूचक विधानंही त्यांनी केलं.

राज्यभरात लोकसभेचं मतदान झालं. लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय प्रश्न आणि राष्ट्रीय भूमिका मांडण्याचा प्रयत्न आम्ही केला. देशाचं भवितव्य ठरवणारी निवडणूक होती, अशा प्रकारे आम्ही या निवडणुकीला सामोरे गेलो. विरोधकांनी अगदी गल्लीबोळातील प्रश्नांवर भर दिला. निवडणुकीच्या प्रचारात विरोधकांकडून ज्या प्रकारे भाषा वापरण्यात आली ही भाषा महाराष्ट्राच्या संस्कृतीला छेद देणारी होती. असं असलं तरी महायुतीला राज्यात निश्चतच चांगलं यश मिळेल. लढती चुरसीच्या होतील पण अंतिम विजय महायुतीचा होईल, असं मत सुनील तटकरे यांनी व्यक्त केलं.



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची परवा महत्वाची बैठक मुंबईत बोलावली आहे. या बैठकीला पक्षाचे सर्व प्रमुख नेते उपस्थित असणार आहेत. आमची आढावा बैठक जरी असली तरी आम्ही स्पष्टपणे धोरण ठरवलेलं आहे. आता एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र, हे सूत्र आम्ही राबवणार आहोत. या माध्यमातून पुन्हा एकदा संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने पावलं उचण्यात येतील. १० तारखेला वर्धापन दिन आहे. हा वर्धापन दिन मुंबई आणि दिल्लीत साजरा करण्याचं नियोजन आहे. त्या बैठकीला सर्व नेते उपस्थित राहतील. तसेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरच्या अनेक सहकार्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश होईल. हा पक्षप्रवेश राज्याच्या, देशाच्या आणि पक्षाच्या राजकारणाला कलाटणी देणारा असेल, असं सुनील तटकरे यांनी यावेळी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात होणाऱ्या पक्ष प्रवेशाबाबत बोलताना सुनील तटकरे म्हणाले, अनेकांचा संपर्क वेगवेगळ्या स्थरावर आहे. संघटनात्मक स्थरावरही संपर्क आहे. काहींशी माझा संपर्क तर काही अजित पवार यांच्या संपर्कात आहेत. काहीजण प्रफुल्ल पटेल यांच्याही संपर्कात असू शकतात. त्यामुळे सर्वकाही चित्र २७ तारखेला स्पष्ट होईल, असं मोठं विधान सुनील तटकरे यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केलं.

## संपादकीय

### स्पष्टपणे समोर येईल...

पाचवा टप्पाही पार पडला असून आता केवळ दोनच टप्पे उरले आहेत. त्यामुळे आता लोकांचा चर्चेचा रोख कोणत्या पक्षाची सत्ता येणार यावर केंद्रित झाला आहे. सगळे यू ट्यूब चॅनेल आणि निवडणूक विश्लेषक पाच टप्प्यांच्या आधारे आपापली मते व्यक्त करण्यात व्यस्त आहेत. या सर्वांच्या विश्लेषणाकडे लक्ष दिले तर आज ही सत्तेची स्थिती अत्यंत दोलायमान असल्याचेच संकेत मिळत आहेत. काही जण पुन्हा मोदीच पंतप्रधान होणार असल्याचे छातीठोकपणे सांगत असतात, तर काही जण मोदी पराभूत होणार असल्याची भाकिते करताना दिसतात. तथापि, यात भाजपला मोठा फटका बसणार असल्याची भाकिते सर्वाधिक आहेत. सर्वत्र निकालाची चर्चा रंगत आहे. अशा टप्प्यावर सट्टाबाजारातील लोक काय म्हणतात याचीही अधिक चर्चा रंगते. राजस्थानात जयपूरपासून १६० किमी अंतरावर असलेल्या फलोदीच्या सट्टाबाजाराच्या भाकितांना अलीकडच्या काळात मोठे महत्त्व आले आहे, अनेकांच्या मते, हा बाजार अगदी अचूक भाकीत करीत असतो. कारण त्यावर त्यांचे र्थकारणही अवलंबून असते. त्या बाजारातील सध्याचे भाव लक्षात घेतले तर मोदीच पुन्हा सत्तेवर येणार असल्याचे संकेत मिळतात. दुसरीकडे, सर्व टीव्ही वाहिन्यांवर भाजपच पुन्हा सत्तेवर येणार असल्याचा बोलबाला दिसत असून सर्व यू ट्यूब वाहिन्यांवर मात्र मोदी घरी जाणार आणि इंडिया आघाडीची सत्ता येणार अशी सरळ विभागणी झाली आहे. यू ट्यूब चॅनेलवरही एकापेक्षा एक निवडणूक भाष्यकार आहेत. त्यांनी ग्राउंड रिपोर्टच्या आधारे इंडिया आघाडीचीच सत्ता येणे आता अटळ असल्याचे म्हटले आहे. त्यातही सध्या उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या दोन महत्त्वाच्या राज्यांवर बहुतेकांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यातही अगदी टोकाची भाकिते केली गेली आहेत. महाराष्ट्रात चार ते पाच जागा सोडल्या, तर बहुतांशी जागा महाविकास आघाडी जिंकणार असल्याचे भाकीत केले गेले आहे. तर काही ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडी यांची काट्याची टक्कर होईल; पण महायुतीचाच वरचष्मा राहील असे नमूद केले गेले आहे. टीव्ही मीडियावर मोदींचे एकतर्फी वर्चस्व दिसले तरी सोशल मीडियावर मोदी आणि भाजपला इतक्या टोकाच्या कुचेष्टेला सामोरे जावे लागले आहे की, त्यातून देशात मोठा बदल घडून येईल असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. चार जूनपर्यंत या चर्चा आता सुरूच राहतील. पण एक जूनला एक्झिट पोलमधून एकूण रागरंग अधिक स्पष्टपणे समोर येईल.

## शिक्षणाचे भगवेकरण? श्लोक ते शोक

गुलामीची अनेक हत्यारे असतात. त्यात पूजा पाठ बंदी वेद पठणबंदी, वेद श्रवणबंदी ही हत्यारे आहेत वैदिकाणि ती इथे काही शतके वापरले आहेत आणि त्यातूनच मंत्र ही शक्ती आहे .मंत्र हे दैवी सामर्थ्य आहे. मंत्र फक्त ब्रह्मवंदाने पठण करायचे आसतात त्यांनाच अधिकार आहे. इतरांना मंत्र पठणाचे अधिकार नाहीत. या सर्व अन्याय अत्याचाराच्या परंपरा ग्रामण्य ते राज्याभिषेक हा मोठा कालखंड अत्याचाराचा जाती व्यवस्थेतील वर्णानी अनुभवला आहे.

ही धार्मिक गुलामी पुन्हा प्रस्थापित करावयाची असेल, तर शिक्षण बंदी शिवाय दुसरा मार्ग नाही. धार्मिक गुलामगिरी श्लोक, अध्यायन,मंत्र या पटनातून तयार करता येते. श्लोक हे धर्म तत्त्वज्ञान नाही .भागवद गीतेचा बारावा अध्याय हे जागतिक ज्ञान नाही तरीही टप्प्याटप्प्याने मनाचे श्लोक पाठांतर करावयास लावून ,धर्माची नशा लहानपणापासून लावण्यासाठी एससीआरटीने पाठ्यपुस्तकात श्लोकाच्या पाठांतराची केलेली सूचना आणि भगवद्गीतेच्या १२व्या अध्यायाचे पाठांतर या दोन्हीही सूचना नव्या शैक्षणिक धोरणाची अनुस्फोटाची सुरुवात ठरणार आहेत.

मनाचे श्लोक हे संविधान नाही. मनाचे श्लोक हे थोडे नागरिकशास्त्र थोडा मन उपदेश अशी संमिश्र रचना आहे. मनाच्या श्लोकात सदवर्तनाचे आदेश ही आहेत मनाच्या श्लोक पाठांतराने संप्रदायाचे लोक नितिमान झाले असा इतिहास नाहीये .मनाच्या श्लोक संप्रदायाने मात्र प्रसार करून कोट्या वधी दान प्राप्तीचा विकसित भक्तिसंप्रदाय मार्ग तयार केला आहे .

मनाचे श्र्लोक पाठांतर हे पडीक ज्ञान आहे .अर्थ शून्य पाठांतर हा विचार शक्ती विकास रोखण्याचा व्यापक डाव आहे. बालकाचे भाषिक कौशल्य शब्द कौशल्य संवाद कौशल्य हे पाठांतरात गुंतवून त्यालाच ज्ञान आणि शिक्षण आहे .असे पालक व शिक्षक यांना भासवण्यासाठी पाठांतराच्या विचारविकास शून्य अवस्थेमध्ये बालशिक्षण नेन्याचे हे प्रयत्न सुरू होतील .एक ते पंचवीस श्लोक एका टप्प्याला ,२५ ते ५०श्लोक दुसऱ्या टप्प्याला, असे मनाच्या श्र्लोकाचे पाठांतराचे टप्पे पाडून बालशिक्षणामध्ये गोंधळ उडवून देणे हे कारस्थान दिसते . अन्य विषयांना महत्त्व नाही अशी मानसिकता पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांची तयार करणे असा धूर्त धार्मिक गुलामीचा कट श्लोक पाठांतराच्या आगामी सूचनाने अंमलबजावणी मध्ये संभवतो आहे. तो दिसतो आहे.

बालकांचा मज्जा विकास हा पाठांतराने होतो. असे जगभर सिद्ध झालेले नाही. भाषिक शब्द, उच्चार वेग वाढतो आणि उच्चार शुद्धी याच काही विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यवर होणारा परिणाम या पलीकडे मनाच्या श्र्लोकाने पाठांतराने काही साध्य होत नाही. संवाद कौशल्य विकसित झाले ,शब्द संपत्ती वाढली शब्दांचा अन्वयार्थ कळाला आहे.शब्द अचूक वापरता येतात.

असा सातारा स्थित गेली ४० वर्षात सर्व शाळांच्या मधून मनाचे श्र्लोक पाठांतर करून घेतले जातात परंतु त्या मुलांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये या भाषिक कौशल्यांचा बदल झाला आहे .असे अजिबात आढळून येत नाही. आलेले नाही. मात्र मनाच्या श्लोकाचे पाठांतर करून घेणारे संप्रदायाचे सेवक हे धन्यता मानतात. संप्रदायाच्या परीक्षा घेतात ती गोळा करतात .विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना मुलगा धार्मिक सात्विक संस्कारात वावरतो आहे . तो पाठांतर करतो आहे. तो सदाचारी होतो आहे .असे नुसतेच चुकीचे वाटून राहते . त्याचवेळी मात्र संप्रदायाचा प्रसार याचा होत राहतो.

भगवद्गीतेचा बारावा अध्याय हा वरच्या विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेण्याबाबतची होणारी सक्ती ही धर्म श्रद्धा रुजवण्याचा व धर्माने हिसेला मुभा दिली आहे . स्वकीय नाते वाईक यांच्याशी युद्ध केले तरी त्याला क्षम्य केले जाते त्यास मान्यता आहे.एवढेच नव्हे कपटकारस्थाने ही धर्माला मान्य आहेत. काव्याच्या महाकथे ला एक धर्म एक ग्रंथ याचे स्वरूप देण्यासाठी तर शिक्षण क्षेत्रातूनच त्याची पार्श्र्वभूमी बनवण्यासाठी भगवद्गीतेचा बारावा अध्याय हा सक्तीने पाठांतर करावयास लावण्याचा अत्यंत व्यापक कपटकारस्थानाचा हा प्रयत्न आहे. आज ही दंतकथा चमत्कारीक कथा स्वप्रक्षेपित कथानके ही ज्या ज्या काव्यात आणि महा कथेत घुसडलेली आहेत. तो खरा इतिहास आहे ते खरे ज्ञान आहे .असा सांगण्याचा आटापिटा धर्मवाद्यांच्या संप्रदायांचा सतत चालू असतो तोच हा प्रयत्न आहे धार्मिक शिक्षण हे नीती शिक्षण नाही .धार्मिक शिक्षण हे ज्ञान शिक्षण नाही. धार्मिक शिक्षण विचार शिक्षण नाही .धार्मिक शिक्षण कल्पना आणि सृजन शिक्षण नाही .धार्मिक शिक्षण नशा शिक्षण आहे धार्मिक शिक्षण धर्मांध शिक्षण आहे.धार्मिक शिक्षण विषमतेचे शिक्षण आहे.धार्मिक शिक्षण जातीयता पाळण्याचे शिक्षण आहे धार्मिक शिक्षण पूजा कर्म कांडा च्या व्यवसायाला ऊर्जेत अवस्था देण्याचे शिक्षण आहे.

मनाचे श्लोक आणि भगवद्गीता पाठांतर हा नुसता धर्म संसदेचा धर्मशाहीचा पाया घालण्याचा हा प्रयत्न आहे. .धार्मिक राष्ट्र ,हिंदू राष्ट्र, पुण्यभूमी तयार करावयाची एका टप्प्यावरची ही प्रक्रिया व्यापक कटाचा चालू असलेला हा प्रयत्न आहे.शिक्षण क्षेत्रामध्ये पालक शिक्षक यांनी हा चालू देता कामा नये. स्वीकारता कामा नये.

एका बाजूला जगातील बाल शिक्षणात मज्जा शिक्षणाचे प्रयोग चालू आहेत बहुविध बुद्धिमत्तेचा शोध घेऊन त्यावर प्रयोग करून बाल मानसशास्त्रीय पद्धतीने बुद्धीचा विकास किती अनेक पातळ्यावर करता येतो. हे प्रायोगिक मज्जा शिक्षण सुरू झाले आहे .आणि महाराष्ट्रात धर्मवाद्यांनी सत्तेच्या आधारे धुमाकूळ घातला आहे अशा सूचना हा अत्यंत युद्धनीतीचा संविधान विरुद्ध धर्म ग्रंथ असा धार्मिक लढाईचा पायाच घालण्याचा हा प्रयत्न आहे .या देशातील बहुधर्मीय बांधवांच्या धर्मश्रद्धा धर्मकर्मकांडे श्रद्धा उपासना आचार आचरण हे बहिष्कृत करण्याचा हा प्रयत्न आहे. या देशातील बहुधर्मीयता ही व्यक्ती श्रद्धेची खाजगी बाब मानली आहे. पण आदर देणे कर्तव्य ठरविले आहे. इथेराष्ट्राला धर्म नाही .सरकारला धर्म नाही. शिक्षणात धर्म नाही .धर्मनिरपेक्ष नीतीचा सर्वत्र स्वीकार करणे आणि प्राधान्याने तसे वर्तन करणे एका धर्माच प्रभुत्व हे इतर धर्मियांवर लादता कामा नये धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मवीहीन वर्तन नव्हे सर्वधर्मसमभावाच्या भोंगळकल्पने तला धर्मवाद्यांनी सतत टीकेचा विषय बनवला आहे. याचे मुख्य कारण वैयक्तिक प्रत्येक धर्म बांधवाला असलेले श्रद्धा आणि उपासनेचे स्वातंत्र्य जपत राष्ट्रीय नैतिक मूल्यांचा स्वीकार करीत राष्ट्रीय जीवन जगणे इतरांच्या धर्म श्रद्धाचा आदर करीत राष्ट्राला धर्म नाही .अशा व्यापक मानवतेच्या दृष्टीने वर्तन करणारे बांधव विकसित करणे हा धर्मनिरपेक्ष शिक्षणाचा हेतू आणि पाया रचलेला होता. या धर्मनिरपेक्षित शिक्षणाला उखाडून टाकण्यासाठी मनाचे श्लोक व भगवद्गीता बारावा अध्याय पाठांतर या विषारी कल्पना धर्मांध विद्यार्थी बनवणाऱ्या कल्पना पुढे आणली आहे या सूचना लादल्या जाणार आहेत.

प्रस्तुत लेखनकर्त्याने सप्टेंबर २०२० मध्ये नवमतशिक्षण या एन ए पी च्या पुस्तकाच्या अंतरंगात काय दडले आहे हे उघड केले आहे .या पुस्तकातील पान क्रमांक ५५ ते ६१ या मध्ये तीन प्रकरणे धार्मिक शिक्षण संप्रदायिक शिक्षण आणि शिक्षणाचा इतिहास या तिन्ही प्रकरणात पुढे कोणते बदल होणार आहेत हे नमूद केले होते आहे .

एलीच नावाच्या शिक्षण तज्ञांने पारंपारिक शाळा नष्ट करा अशी घोषणा देऊन जगाच्या शिक्षण क्षेत्रात गोंधळ माजवला होता. भारतातल्या धर्मशाहीच्या या वर्ण वंशवाद्यांनी मात्र शिक्षणात मनाचे श्र्लोक व भगवद्गीता पाठांतर या सूचनाच नव्हे तर अंमलबजावणीला सुरुवात करून धार्मिक मोठा गोंधळ सुरू केला आहे. हा गोंधळ विधायक रूपांतरित व्हायला हवा आहे.

म्हणजेच बाल शिक्षण जे वाऱ्यावर सोडले आहे .त्याची जबाबदारीने एन इ पी मध्ये नाकारलेली आहे .त्याकडे समाजाचे लक्ष जाईल का? बाल शिक्षण उपेक्षित ठेवून शास्त्रीय पद्धतीने मज्जा विकासाच्या निष्कर्षाच्या आधारे ते पुढे जायला हवे. आज असे प्रयत्न व्यापकपणे अजिबात होताना दिसत नाहीत. पारंपारिक शाळा नष्ट करा, ही इलीच घोषणा महाराष्ट्र देशी नव्याने बदलून देण्याची गरज आहे धार्मिक शिक्षण नष्ट करा मनाचे श्र्लोक रद्द करा भगवद्गीता पाठांतर रद्द करा आणि धर्म गुलामीतून मुक्त करणारे विचार व भाषा संवाद कौशल्य विकसित करणारे शिक्षण मुलांना द्यायला हवे .अशी मागणी मोठ्या प्रमाणात पालक वर्गातून पुढे येण्याची गरज आहे. अभ्यासक्रम हा केवळ एक सहिता आहे .एक आराखडा आहे .पण त्यात व्यापक हितसंबंधी गुंतागुंतीची उद्दिष्ट असतात. त्यात आर्थिक उद्दिष्ट असतात .ती प्रभुत्वाची उद्दिष्ट असतात. तो त्या वर्गाचा रोजगाराचा मार्ग असतो .त्यातून साध्य होणारा वर्चस्व प्रस्थापित परिणाम साध्य होत असतो. स्वामी ,महाराज संप्रदाय ,सेवक आणि दान पेटी याचा एक वर्ग नव्याने या उद्दिष्टातून तयार होतो. मनाचे श्र्लोक पाठांतर आणि भगवद्गीता बारावा अध्याय पाठांतर यातून हे सर्व पुनर्रपी धर्म अंधानूकरण खोल रुजविले जाणार आहे. इथे समाज धर्माने न सुधारला ,धर्माने न बिघडला, धर्माने न घडला , अशी अवस्था आहे म्हणून पुन्हा हा समाज पुन्हा ब्राह्मणी व्यवस्थेच्या वर्णव्यवस्थेच्या व्यापक शोषण कटाचा भाग बनवण्याचे चाललेले प्रयत्न रोखले पाहिजेत .औपचारिक शाळेतील बाल शिक्षण झाले नाही. तरी चालेल उलट होम लर्निंग ,सुरू व्हायला हवे आई-वडिलांच्या आजी-आजोबांच्या सानिध्यात बालकांचा बौद्धिक विकास होतो. कौशल्यांचा विकास होतो . निव्वळ पाठांतर वादी ,मुलांचा एक्स्टर्नल ब्रेन चा विकास होत नाही .

जगातल्या ,एक्स्टर्नल ब्रेनच्या शिक्षणाला सुरुवात झाली आहे .आणि इथे मात्र पाठांतर सक्तीचे करून मुलांच्या बुद्धीचा विकास पूर्ण रोखणे .श्रमिक तांडे तयार करणे वर्ण व्यवस्थेचे गुलाम तयार करणे .धार्मिक दान कर्ते तयार करणे. देवळे मंदिरे ग्रंथ पठ ण यालाच धन्यता मानणारा धर्मानुयायी तयार करणे आणि त्याला ईश्वर ,परमात्मा आणि भगवान यांच्या भयाच्या चक्रात अडकवणे. हे या व्यापक क टातून होणार आहे . म्हणून पालक पालक जागा हो बालकाच्या मज्जा विकासाचा तू धागा हो . शिक्षक शिक्षक जागा हो बालकाच्या विचार शिक्षणाचा धागाहो हे नितांत समजावून घेऊन पारंपरिक शाळा बंद करा .या घोषणेत बदल करून, धार्मिक शिक्षण बंद करा '.या नव्या शिक्षण चळवळी ,पालक चळवळी, बालहक्क शिक्षण चळवळी पुढे तयार होने तात्काळ गरजेचे आहे. हे शिक्षण क्षेत्रातील व्यापक संकटाचे सूचक भान समजले आहे . म्हणून शब्द केले आहे.

**शिवाजी राऊत सातारा**

हे एन इ पी २०२० आधारित नवमत शिक्षण या पुस्तकाचे लेखक आहेत

पान १ वरुन

### उद्या दहावीचा निकाल..

अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून शुल्क भरून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक राहील. पुनर्मूल्यांकन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

मार्च २०२४ च्या दहावीची परीक्षा सर्व विषयांसह देऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी (जुलै-ऑगस्ट २०२४ व मार्च २०२५) श्रेणी/गुणसुधार योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या दहावीच्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी ३१ मेपासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाइन अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

### राज्यातील ७४३ शेतकऱ्यांमध्ये..

असल्याने ते वर्षानुवर्षे चालू राहतात. या सर्व पार्श्र्वभूमीवर वाद संपुष्टात येण्यासाठी शासनाने सलोखा योजना सुरू केली आहे.

शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे किमान १२ वर्षांपासून असला पाहिजे, अकृषिक, रहिवासी, तसेच वाणिज्यिक वापराच्या जमिनींसाठी ही योजना लागू नाही, दोन्ही पक्षकारांनी सर्वसंमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवीत आहे, अशा प्रकारची अट दस्तामध्ये असणे आवश्यक, वस्तुस्थितीदर्शक पंचनामा मंडल अधिकारी आणि तलाठी यांनी नोंदवून घेत पंचनामा प्रमाणपत्र शेतकऱ्यांना दिले जात आहे, पंचनामा प्रमाणपत्र अदलाबदल दस्तास जोडणे आवश्यक अशा अटी योजनेत आहेत, अशी माहिती सह नोंदणी महानिरीक्षक नंदकुमार काटकर यांनी दिली.

### केरळमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा..

तसेच काही ठिकाणी सखल भागात भूस्खलन होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबरोबरच मच्छिमारांनी केरळ किनारपट्टीवर समुद्रात जाऊ नये, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

नैर्ऋत्य मोसमी वारे पहिल्यांदा अंदमान-निकोबार बेटांवर आणि नंतर केरळमध्ये दाखल होतात. तेथून नंतर टप्प्याटप्प्याने मोसमी पाऊस महाराष्ट्र आणि देश व्यापतो. नैऋत्य मान्सून केरळमध्ये ३१ मे पर्यंत दाखल होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तर महाराष्ट्रात मान्सून १० ते ११ जूनपर्यंत दाखल होण्याची शक्यता आहे. यंदा मान्सूनचा पाऊस सामान्य राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मान्सूनच्या आधी सध्या शेती मशागतीला वेग आल्याचं पाहायला मिळत आहे.

### आधी तुमचा देश सांभाळा,..

जनता आमच्या समस्या सोडविण्यासाठी सक्षम आहोत. आम्हाला तुमच्या पोस्टची गरज नाही. सध्या पाकिस्तानची अवस्था अतिशय गंभीर आहे. तुम्ही आधी तुमचा देश सांभाळा. भारतातील निवडणुका हा आमचा अंतर्गत विषय आहे. दहशतवादाला सर्वाधिक प्रोत्साहन देणाऱ्यांकडून आम्हाला या विषयात ढवळाढवळ नको आहे.

फवाद हुसैन चौधरी यांनी याआधीही भारतीय निवडणुकीवर भाष्य केलेले आहे. गुरुवारी त्यांनी राहुल गांधी यांचा एक व्हिडीओ शेअर केला होता. हा व्हिडीओ शेअर करताना त्यांनी राहुल गांधींचे कौतुक केले होते. हुसैन यांच्या कौतुकानंतर भाजपाला आयता मुद्दा मिळाला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, पाकिस्तानचे माजी मंत्री फवाद हुसैन चौधरी यांनी पुलवामा आणि उरी हल्लूयामागे पाकिस्तानी दहशतवादी असल्याचा दावा केला होता. त्यांनी पंतप्रधान मोदी यांचे कधीही कौतुक केले नाही. पण ते राहुल गांधींचे मात्र कौतुक करत आहेत.

## वादळी वाऱ्या व पाऊसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे, घरांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत : शिवराम गायकवाड

माळशिरस/प्रतिनिधीः माढा लोकसभा मतदार संघातील समाविष्ट तालुक्यापैकी माढा, माळशिरस, करमाळा, सांगोला,पंढरपूर, फलटण, माण- खटाव या तालुक्यांसह माळशिरस, माढा, पंढरपूर तालुक्यात सलग तीन - चार दिवसापासून वादळी वाऱ्यासह कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत आहे. वेगवान वाऱ्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह माढा लोकसभा मतदारसंघातील माढा,पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील सर्व गावांसह बोरगाव, माळेवाडी(बो), माळखांबी, जांभूड, खळवे, खंडाळी, महाळूंग, नेवरे,उंबरे (वे), कोंढारपट्टा, तोंडले -बोंडले,अकलूज, माळेवाडी (अ), यशवंतनगर,माळीनगर,लवंग, वाघोली, वाफेगांव, गणेशगांव, संगम, बाभुळगांव यांसारख्या अनेक गावांमध्ये आंबा, केळी, नारळ, पेरू, द्राक्षे, सीताफळ, डाळिंब,ड्रॅगन फूड या फळबागांसह झेंडू, गुलाब,शेवंती आदी फुलबागांचे व ऊसाचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्यांचे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन महसूल, कृषी अधिकारी,महावितरण व संबधित प्रशासन अधिकारी व कर्मचारी यांनी पंचनामा अहवाल तयार तात्काळ करण्यात यावेत त्याचबरोबर माढा लोकसभा मतदार संघातील माळशिरस तालुक्यातील काही गावांमध्ये काही कुटुंबांच्या घरांचे पत्रे उडाले आहेत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले असून,घरांची पडझड, जनावरांचा गोठा,चारा पिके भुईसपाट झाली आहेत व वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे चारा उडाला आहे त्यामुळे चाऱ्याचाही प्रश्र्न निर्माण झाला आहे. काही ठिकाणी वादळी पाऊस व वारे यांमुळे मोठ्या संख्येने शेतातील महावितरण खांब, माठमोठाली झाडे,फळबागाही मोडून पडली आहेतसदर ठिकाणी संबधित प्रशासन अधिकारी, कर्मचारी यांनी तेथील स्पॉट पंचनामा अहवाल तात्काळ तयार करून संबधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १,००,००० लाख रुपये आणि घरांची पडझड,पत्रे उडालेल्या प्रती कुटुंबांना ५०,००० हजार रुपयांपर्यंत शासकीय आर्थिक मदत जाहीर करावी आणि संबंधित नुकसानग्रस्त कुटुंबांचे घरांची दुरुस्ती करावी अश्या आशयाचे निवेदन प्रांत कार्यालय अकलूज यांच्याकडे देण्यात आले त्यावेळी चंदनशिवे साहेब यांनी निवेदन स्वीकारले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांचे नळदुर्ग येथे भीम सैनिकाने केले जोरदार स्वागत

**वागदरी/एस.के.गायकवाड**

ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांचे नळदुर्ग येथे दमदार आगमन होताच येथील ऑल इंडिया पँथर सेनेचे कार्यकर्ते भीम सैनिकांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.



धाराशिव जिल्ह्यातील जेकेकूर ता.उमरगा येथील बौद्ध समाजातील १९ वर्षीय युवक आदेश जेटीथोर यांच्यावर येथील काही जातीयवादी गावगुंडांनी केवळ जातीय द्वेष भावनेतून चाकुने वार करून जिवघेणा हल्ला केल्याची घटना नुकतीच घडली आहे.

या प्रकरणी चौकशी करून पिडीत कुटुंबाला भेट देण्यासाठी दिपक केदार हे नळदुर्ग मार्गे उमरगा जात असताना नळदुर्ग येथील बसस्थानका समोर राष्ट्रीय महामार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात त्यांचे आगमन होताच येथील ऑल इंडिया पँथर सेना कार्यकर्ते व भीम सैनिकांनी त्यांचे जोरदार स्वागत करून त्यांच्या लढ्याचे समर्थन केले.


यावेळी रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, ऑल इंडिया पँथर सेनेचे नळदुर्ग शहराध्यक्ष ऋषीकेस कांबळे, उपाध्यक्ष सुशांत बनसोडे, सचिन बनसोडे,अमर बनसोडे, सम्राट ग्रुपचे संस्थापक सुर्यकांत (पप्पू) सुरवसे,संदेश दुरूगकर, योगेश सुरवसे तुषार गायकवाड, निलेश बनसोडे, अक्षय कांबळे, योगेश दुरूगकर सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण सांस्थेचा कला, विज्ञान,वाणिज्य शाखेचा १००% निकाल..!

**माळशिरस/प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील (सोलापूर) चांदापुरी येथील सोशल संस्था संचलित सदाशिव देठे निवासी प्रशाला व ज्यू कॉलेज इ बारावी फेब्रु/मार्च २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेचा सर्व विभागाचा कला,विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल १००% लागला आहे.

विद्यार्थी गुणवत्ता, नवोदय, शिष्यवृत्ती,NMMS, IT, NEET, JEE, MH-CET,मेडिकल,फार्मसी,हॉटेल मॅनेजमेंट अगदी सर्वच क्षेत्रात विद्यार्थी गुणवत्तापूर्ण घडत आहेत.सलग आठव्या वर्षी संस्थेचा निकाल शंभर टक्के लागल्यामुळे पुन्हा एकदा गुणवत्ता व विद्यार्थी घडवण्याची हमी सिद्ध झाली आहे.महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने बारावी (क्ष्ह्उ) परीक्षेसाठी एकूण ११७ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते.




कला विभागात प्रथम क्रमांक सरतापे शिवाणी पितांबर (७१.८३%) द्वितीय क्रमांक साठे प्रथमेश बाळासाहेब (६६.००%) तृतीय क्रमांक मगर चंदना भागवत (६४.५०%) विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक गोंजारी शुभम राजेंद्र (७१.८३%) द्वितीय क्रमांक गोरवे श्रुष्टी मसू (७१.३३%) तृतीय क्रमांक देठे अक्षता जितेंद्र (६६.५०%) तर वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक वाकडे स्नेहा हरी (६०.३३%) द्वितीय क्रमांक खुडे वैभव नामदेव (५७.६७) तृतीय क्रमांक आदाटे अथर्व राजेश (५२.३३) असे गुण विद्यार्थ्यांनी प्राप्त केले आहेत तर (१७ नंबर) खाजगी विद्यार्थी सर्व शाखांचा निकाल सुद्धा १००% लागला आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक डॉ.कुमार लोंढे,शाळा समितीचे गोविंद कांबळे,जितेंद्र देठे,बाळासो जाडकर, सचिव डॉ. पंचशीला लोंढे,प्राचार्य,विभागप्रमुख प्रा. राजेश वायदंडे,प्रा.डी.कारंडे,प्रा.नितीन सरक,प्रा.ए पठाण,काळे मॅडम,अरुणा मॅडम, प्रा.व्ही देवकाते इ नी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.परिसरातील ग्रामस्थ ,मान्यवर ,सरपंच उपसरपंच,शाळेचे हितचिंतक व सर्व स्तरातून संस्थेवर शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.

# बार्टी संस्थेत बुद्ध जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा



**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे विश्र्वशांतीगुरु तथागत गौतम बुद्ध यांचा जन्मोत्सव बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे, विभागप्रमुख, डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, विभागप्रमुख ( विस्तार व सेवा आयबीपीएस) नेल्सन डाळिंबे, धम्मप्रचारक यांच्या हस्ते बुद्धरुप आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. बुद्ध पौर्णिमेनिमित्त शुभेच्छा देताना विभागप्रमुख

डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण म्हणाले की, जगातील १८० राष्ट्रात बौद्ध पौर्णिमेचा उत्सव साजरा होत आहे. बुद्धांनी वेद कर्मकांड अंधश्रद्धा श्रेष्ठ कनिष्ठ यांना नाकारून मानवतावाद विज्ञानवादाचा पुरस्कार केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी विज्ञानवादी धम्म आम्हाला दिला. बार्टीचे तत्कालीन महासंचालक श्री धम्मज्योती गजभिये यांनी बार्टी संस्थेमध्ये बुद्धरूप प्रस्थापित केले त्याबद्दल डॉ चव्हाण यांनी त्यांचे आभार मानुन हि ऐक ऐतिहासिक घटना असल्याचे नमुद केले.

तसेच त्यांनी बौद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन बुद्ध पौर्णिमेचा सोहळा यशस्वी करणाऱ्या बार्टीतील महिला कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. धम्मप्रचारक नेल्सन डाळिबे धम्मदेशना देतांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आज आमचा जगात सन्मान होत असून त्यांच्या विचारशी प्रमाणिकपणे राहून कार्य केले पाहिजे आज संपूर्ण जगच बुद्धाच्या मानवतावादी विचाराला प्राधान्य देत आहे म्हणून त्या राष्ट्राची प्रगती होत आहे. बार्टी ही नामांकित संस्था असून बार्टीमुळे अनेक विद्यार्थी अधिकारी होत आहेत असे मत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख मान्यवरांना गुलाब पुष्प भेट देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी श्रीमती इंदिरा अस्वार, निबंधक, बार्टी डॉ संध्या नारखडे, कार्यालय अधिक्षक, विधी सल्लागार श्री हेमंत आहिवळे, प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, डॉ सारिका थोरात,आरती जाधव,सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड, डॉ अंकुश गायकवाड, नसरिन तांबोळी, मनोज खंदारे, रामदास लोखंडे, धिरज खाडे, अमिर मुलानी,श्रीमती सुनंदा गायकवाड, जागृती गायकवाड, तेजस्विनी सोनवणे, उषा भिंगारे, आकाश कु-हाडे, विनायक भालेराव , यश कांबळे, गौरी वाघमारे मनिषा धाईजे, राहुल कवडे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ सारिका थोरात यांनी केले. आभार श्रीमती वैशाली खांडेकर यांनी मानले .

# २.५० कोटींच्या योजनेची मुदत संपली,
## दरेगाव जलजीवन योजना रखडतच



गावातील पाणी समस्या कायमची सुटावी यासाठी जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर झाली . परंतू ठेकेदार यांच्या दिरंगाई मुळे आणि ईस्टीमेट नुसार काम होत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत .

**शेर खाँ पठाण,सामाजिक कार्यकर्ते दरेगाव**

गावातील सरपंच आणि काही नागरिकांच्या तंक्रारी आहेत . त्या तक्रारीचे निवारण झाल्यानंतर उर्वरित काम पूर्ण करण्यात येईल **.ए.एच चव्हाण,उपविभागीय अभियंता , चिखली**

**बुलढाणा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दरेगाव येथील जलजीवन मिशन योजने अंतर्गत २:५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते . या योजनेचा कालावधी दोन वर्षांचा असताना मार्च २४ मध्ये कालावधी संपला आहे . परंतू योजनेचे ५० टक्केही काम पूर्ण झाले नाही . त्यामुळे भिषण पाणी टंचाईच्या काळात विहीर अधिग्रहणाचा आधार घ्यावा लागत आहे .

दरेगाव येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेवरुन गावात पाणी पुरवठा होत नसलेल्याने जलजीवन मिशन अंतर्गत नळयोजना मंजूर करण्यात आली . सदर योजनेचा कत्राट ठेकेदाराने घेतल्यानंतर विहीरीचे काम सुरु करण्यात आले . जागदरी तलावाच्या काठावर विहीर खोदून बांधकाम करण्यात आले . तेथून दरेगाव गावापर्यंत जलवाहिनी टाकण्यात आली . जलवाहिनी टाकतांना किती खोल हवी यावर तर्क वितर्क काढल्या जात आहे . तर काही ठिकाणी उघडीच जलवाहिनी दिसत असल्याने शंका उत्पन्न होते आहे . जलकुंभाचे काम ईस्टीमेट नुसार होत नसल्याने स्थानिक नागरिकांनी तंक्रार केली होती . यावर उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा योजना ए एच चव्हाण यांनी पाहणी करून ईस्टीमेट नुसार काम करण्याचे आदेश दिले . परंतू जलकुंभाचे काम अद्याप सुरुच करण्यात आले नाही . जलजीवन मिशन योजने अंतर्गत या कामाला ३ मार्च २२ ला मंजुरात मिळाल्या नंतर २३ सप्टेंबर २२ रोजी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती . मार्च २४ ला काम पूर्ण करुन ग्राम पंचायतीला हस्तांतरित करायला पाहिजे होती . परंतू मुदत संपली असताना ५० टक्केही काम पूर्ण झाले नसल्याने यावर्षी पाणी पुरवठा होऊ शकत नाही . दरवर्षी दरेगाव येथील नागरिकांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येतो . यावर्षी विहीर अधिग्रहणाचा आधार घ्यावा लागत आहे.



# वागदरी ग्रा.प.च्या वतीने इ.१२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

**वागदरी/एस.के.गायकवाड**

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील इ.१२ वी बोर्ड परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इ,१२ बोर्ड परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या बोर्ड परिक्षेत वागदरी येथील विविध ठिकाणी कॉलेज मध्ये शिकत असलेले एकुण चौदा विद्यार्थी गुणवत्तापुर्ण मार्क मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.असा सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी म्हणून वागदरी ग्रामपंचायतीच्या व समस्त ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सौ.तेजाबाई शिवाजी मिटकर, उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जेष्ठ कार्यकर्ते तथा सेवा निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांची शुभेच्छा पर भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यानी केले.यावेळी ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्र्वर पाटील, अमोल पवार,अंकुल वाघमारे, गुणाबाई बनसोडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामसिंग परिहार, रामचंद्र यादव,शंकर धुमाळ, धनाजी बिराजदार, नामदेव यादव, ग्रामसेवक एम.एम.तांबोळी संगणक ऑपरेटर अमित लोंढे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार संघाची मागणी लोकसभेत लावून धरू : निलेश लंके
## सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या शिष्टमंडळाला ग्वाही

**अहमदनगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ग्रामीण भागातील पत्रकारांची प्रश्न आपणाला माहित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने निवेदनात केलेली मागणी आपण संसदेच्या सभागृहात लावून घेऊ अशी ग्वाही अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी दिली तर लोकसभा निवडणुकीवर निकालानंतर इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर येणार असून आपलाही विजय पक्का आहे असा दावाही त्यांनी केला.



महाराष्ट्राचे पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्र्वास आरोटे यांचे नेतृत्वाखाली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरचंद्र पवार गटाचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांची भेट घेऊन केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना वार्षिक काय करात पाच हजार रुपये सूट द्यावी या मागणीचे निवेदन दिले. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात विविध पक्षाच्या उमेदवारांना पत्रकारांच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी निवेदन देण्याची मोहीम राबवण्यात आली याच मोहिमे अंतर्गत पत्रकार संघाचे सरचिटणीस विश्र्वास आरोटे यांनी पत्रकार संघाच्या वतीने सुरू असलेल्या मोहिमेची माहिती दिली. यावेळी निलेश लंके यांनी पत्रकारांचे प्रश्र्न आपणाला जवळून माहित आहेत, आपल्या देशात पत्रकारांचा मोलाचा वाटा आहे त्यामुळे लोकसभेत प्रकारांचे प्रश्र्नांना आपण प्रधान्य देऊ.प्रदेशाध्यक्ष वसंत राव मुंडे राज्य संघटक संजय भोकरे यांनी बेळगाव दिल्ली गुजरात महाराष्ट्र गोवा राज्यात पत्रकारांचे चांगले संघटन केले असून पत्रकारांच्या विविध प्रश्र्न सोडवण्यासाठी त्यांचे योगदान आहे. वसंत मुंडे यांनी केलेली मागणी वृत्तपत्र सृष्टीला नवीन ऊर्जा देणारी आहे त्यामुळे केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर आपण या मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करून अशी ग्वाही त्यांनी लोकसभा निवडणुकीनंतर देशात इंडिया आघाडी सरकार येणार आहे आणि अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून आपला विजय निश्र्चित असल्याचा दावाही त्यांनी केला.यावेळी पत्रकार संघाचे डायरी, दिनदर्शिका व माहिती पुस्तिका देण्यात आली.यावेळी दैनिक समर्थ गावकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यासह पत्रकार व संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कर्मयोगी अभियांत्रिकी मध्ये रोहन परिचारक यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

## २१० जनाची रक्तदान, व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पंढरपूर/प्रतिनिधी**

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक मालक यांच्या वाढदिवसानिमित्त कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे शेळवे येथे विविध शैक्षणिक सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला यामध्ये रक्तदान व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस पी पाटील हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते

रक्तदान हे सर्वात श्रेष्ठ दान आणून २४ मे रोजी कॉम्प्युटर सायन्स विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते व आपली सामाजिक जबाबदारी ओळखून महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांनी या कार्यक्रमास उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला यामध्ये सुमारे २१० रक्तदात्यांनी रक्तदान केले यासाठी पंढरपूर ब्लड बँक व अक्षय ब्लड बँक पंढरपूर यांच्या मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातर्फे प्रथम वर्षांमध्ये विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये प्रथम व द्वितीय तृतीय क्रमांकाचे उत्तीर्ण होणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पारदर्शक देण्यात आली. सदरच्या सर्व कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस पी पाटील कर्मयोगी पॉलिटेक्निकल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर श्री डी जी वाळके उपप्राचार्य राजे संशोधन अधिष्ठाता ड्रॉ अभय उत्पाद तसेच विभाग प्रमुख प्रा अभिनंदन देशमाने प्रा राहुल पांचाळ प्राणी प्रा एस एस एम लंबे प्रा दीपक भोसले प्रा गणेश बागल तसेच सर्व प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कळंब शहरात बुद्ध जयंती मोठया उत्साहात साजरी



**कळंब/सुधाकर रणदिवे**

विश्वाला शांततेचा संदेश देणारे महाकारूणीक तथागत महात्मा गौतम बुद्ध, यांच्या २५६८ व्या जयंतीनिमित्त दि. २३ मे २०२४ रोजी कळंब शहरातील विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे स्मारक समितीच्या वतीने तथागत गौतम बुद्ध मुर्ती व विश्वरत्न, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण प्रबुद्ध रंगभूमी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुभाष घोडके यांच्या हस्ते करून सामुदायिकरित्या त्रिशरण पंचशील घेण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे सी.आर गाडगे, राजाराम वाघमारे, मारुती गायकवाड,भास्कर सोनवणे, रसूल खान, निवृत्ती हौसलमल, उत्तम कांबळे, स्मारक समितीचे विश्र्वस्त माजी नगरसेवक डॉ. सुनील गायकवाड, शिवाजी शिरसाठ, राजाभाऊ गायकवाड, प्रमोद ताटे, उत्तम सावंत, शंकर वाघमारे, रमेश बोर्डेकर, भाऊसाहेब कुचेकर, किशोर वाघमारे, माणिक गायकवाड, सचिन तीरकर, महावीर गायकवाड ,मधुकर शिलवंत,शहाजी शिरसट, सुनील तवले, प्रा.अविनाश घोडके, प्रशांत धावारे,भैया जानराव, आदींची उपस्थिती होती.

# श्री स्वामी समर्थ महाराज की जय च्या जयघोषात हजारो भाविक स्वामी समर्थ चरणी नतमस्तक

अक्कलकोट/प्रतिनिधीः ‘अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगिराज श्री स्वामी समर्थ महाराज की जय’चा जयघोष करत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरूवारी बौध्द पौर्णिमेनिमित्त हजारो भाविक श्री स्वामी समर्थचरणी नतमस्तक झाले. गुरुवारी दिवसभरात दीड लाखापेक्षा जास्त भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती देण्यात आली. उन्हाळी सुट्टी, गुरूवार व पौर्णिमेमुळे अक्कलकोटमध्ये अचानक गर्दी वाढली. श्री स्वामी मंदिरातील दर्शन रांग फत्तेसिंह चौक, देशमुख गल्ली ते जोगी विहीरपर्यंत दोन किलोमीटरपर्यंत गेली होती. मे महिन्यातील ४० अंश तापमान, प्रचंड उकाडा, पायाला चटके बसत असतानाही दर्शन रांगेत दोन किलोमीटरपर्यंत महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले थांबले होते. अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय या आबालवृध्दांच्या जयघोषात संपूर्ण आसमंत दुमदुमला. पहाटे चारपासूनच श्रींच्या दर्शनाकरिता स्थानिक व परगावांहून आलेल्या भाविकांची गर्दी होती. सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होण्यासाठी वटवृक्ष मंदिर समितीच्यावतीने दक्षिण महाद्वारालगत बॅरिकेडिंगची सोय करून, भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये याकरिता मंदिरासमोर कापडी मंडप उभारण्यात आला होता



. पण रांग लांब गेल्याने भाविकांची तारांबळ झाली. पहाटे पाच वाजता पारंपरिक पध्दतीने श्रींची काकडआरती झाली. पुरोहित मोहन पुजारी व मंदार महाराज पुजारी व व्यंकटेश पुजारी यांच्या मंत्रोच्चारात पूजा पार पडली. देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनानुसार देवस्थानची नैवेद्य आरती दुपारी १२ वाजता पार पडली. दुपारी १२ ते ४ या वेळेत देवस्थानच्या पूर्वेकडील उपहारगृह परिसरात व भक्त निवास भोजन कक्ष येथे सर्वस्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद देण्यात आला. स्वामी भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. बुधवार पेठ येथील समाधी मठ येथे बौद्ध पौर्णिमेनिमित्त भाविकांनी गर्दी केली होती. १२ वाजता नैवेद्य आरती करण्यात आली. दर्शनाची रांग बसस्थानकापर्यंत गेली होती. अण्णू महाराज पुजारी, धनंजय महाराज पुजारी व सर्व समाधी मठातील पुजारी स्वामी भक्तांना सुरळीत दर्शन होण्यासाठी प्रयत्न करत होते. येथील राजेराय मठ, गुरूमंदिर, शिवपुरी येथेही पौर्णिमेनिमित्त भाविकांनी गर्दी केली होती. कमलाराजे चौक, मैंदर्गी रोड, वागदरी रोड, हन्नूर रोड, नुरद्दीनबाबा दर्गाह या परिसरात भाविकांच्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर बॅरिकेडिंग करून मंदिर परिसरात गर्दी होणार नाही याची काळजी पोलीस प्रशासन घेत होते.

# शिक्षकांच्या प्रश्नासाठी आमदार किशोर दराडे यांची शिक्षण विभागीय कार्यालयात धडक मोहीम

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिक विभागातील आदिवासी विकास कार्यालय, वेतन पथक इत्यादी कार्यालयात शिक्षकांच्या प्रश्नासाठी विद्यमान शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी बैठका घेऊन अधिकारांना धारेवर धरत शिक्षकांचे ही प्रकरणे का थांबली यावर अधिकाऱ्यांना झापले. गेल्या कित्येक दिवसांपासून शिक्षकांचे डी सी पी एस प्रकरणाचा हिशोब, एनपीएस मध्ये वर्गीकरण का होत नाही, शिक्षकांचे वेतन वेळेवर का होत नाही, कोर्टाचा निकाल असताना शिक्षकांची कामे का खोलंबतात, यावर आदिवासी उपायुक्त तुषार माळी, गोलाईत व इतर संभंदित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन ज्यांची प्रकरणे अडकली आहेत अशा सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सोबत बैठक घेतली त्यात अनेक प्रश्र्न लगेच सोडवण्याची मागणी केली. जे प्रश्र्न सुटले नाहीत याचा जाब अधिकाऱ्यांना विचारला. जोपर्यंत प्रश्र्न सुटत नाहीत तोपर्यंत मी आदिवासी विकास विभाग सोडणार नाही असे सांगितल्यानंतर उपयुक्त तुषार माळी यांनी सर्व प्रश्र्न समजावून घेऊन तातडीने कार्य वाही करण्याचे लेखी दिले. काही




अनुदानित संस्था कर्मचाऱ्यांना आदिवासी विभागाची परवानगी न घेता परस्पर कुठलेही मोठे कारण नसताना पदावणात करणे, निलंबनाची कार्यवॉही करत आहेत त्यावर विभागाकडून चौकशी करावी असेही सांगण्यात आले अन्यथा अशा संस्थावर प्रशासक बसवण्यात यावा अशी मागणी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली. या बैठकीस आमदार किशोर दराडे, नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस बी देशमुख, शिक्षक भारतीचे राज्य उपाध्यक्ष के.के.अहिरे, शिक्षक सेनेचे विभागीय अध्यक्ष संजय चव्हाण, टी डी एफ चे मोहन चकोर, महाराष्ट्र राज्य शिक्षक शिक्षकेतर संघटनेचे पुरुषोत्तम रकीबे, मुख्याध्यापक संघटनेचे प्रदीप सांगळे, भागीनाथ घोटेकर, एन ए शिदे . डॉ .अनिल माळी व विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीनंतर वेतन पथक अधीक्षक नितीन पाटील यांच्या कार्यालयात विविध प्रश्र्नावर बैठक घेण्यात आली. त्यात आमदार महोदयांनी नितीन पाटील यांना तुम्ही चांगले काम जरी केले असेल पण राहिलेल्या प्रकरणाबाबत वेतन अधीक्षक कार्यालयाची बदनामी केली म्हणून त्यांना धारेवर धरले. राहिलेली ही कामे आताच पूर्ण होईपर्यंत मी कार्यालय सोडणार नाही, यावेळी त्यांनी आयुक्त सूरज मांढरे, शिक्षण उपसंचालक बी.बी चव्हाण ,शिक्षणाधिकारी प्रविण पाटील यांच्याशी भ्रमण ध्वनी द्वारा वेतन पथकातील कामाबद्दल तक्रार केली. जी प्रकरणे होल्ड केली ती सर्व आताच निकाली काढण्यास सांगितले, अनेक प्रकरणे त्यामुळे निकाली लागली, जी प्रकरणे प्रलंबित आहेत ती तात्काळ करण्यास सांगितली. यावेळी आमदार किशोर दराडे, शिक्षक संघटना पदाधिकारी यांनी अधीक्षकांना कामाच्या बाबतीत विचारणा केली. सातवा वेतन आयोग तिसरा चौथा हफ्ता, प्रलंबित प्रकरणे न होण्याची कारणे, अटॅच, दिटाच, होल्ड केलेली प्रकरणे या सर्वाबाबत अधीक्षकांना धारेवर धरले, तुमच्या ९९ टक्के कामाबाबत आमचे काही म्हणणे नाही त्याबद्दल तुमचा सत्कारही मी केला, पण बाकीचे प्रकरणे लावून धरण्याचे कारण काय ? याबाबत आमदारांनी अधीक्षक नितीन पाटील यांना खड्या आवाजात सुनावले.

या बैठकीस ही वरील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया; ३१२३ प्रवेश अर्ज दाखल

सोलापूर/प्रतिनिधीः बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (आरटीई) प्रवेशासाठी आतापर्यंत ३ हजार १२३ प्रवेश अर्ज दाखल झाले आहेत. ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरण्याची शेवटची मुदत ३१ मे पर्यंत आहे. पाल्याच्या प्रवेशासाठी इच्छुक असणाऱ्या पालकांनी मुदतीत ऑनलाइन अर्ज भरावेत. अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले. दुर्बल, वंचित, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग मुलांना इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक स्तरावर कमीत कमी एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के प्रवेश आरटीई कायद्यानुसार देण्यात येणार आहेत. आरटीई कायद्यानुसार सोलापूर शहर व जिल्ह्याची प्रवेश क्षमता २ हजार ४६४ इतकी आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) अनुसार आरटीईनुसार प्रवेश देण्यात येणार आहेत. यात २९१ शाळात स्वयंअर्थसहाय्यित, विनाअनुदानित, पोलीस कल्याणकारी विनाअनुदानित शाळा आणि महानगरपालिका स्वयं अर्थसहाय्यित शाळांचा समावेश आहे.

# माढा लोकसभा मतमोजणीला एका टेबलला तीन कर्मचारी

## ६५० कर्मचारी नियुक्त; सोमवारी प्रशिक्षण

सोलापूर/प्रतिनिधीः माढा लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी ४ जून रोजी सकाळी आठ वाजता रामवाडी गोदाम येथे सुरू करण्यात येणार असून यासाठी एकूण ६५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोस्टल मते मोजण्यासाठी २५० तर मतदान यंत्रातील मतांच्या मोजणीसाठी ६०० कर्मचारी असणार आहेत. मतयंत्रातील मोजणीसाठी एका टेबलला १ मोजणी पर्यवेक्षक, १ सूक्ष्म निरीक्षक व एक शिपाई असे एकूण तीन कर्मचारी असणार आहेत, अशी माहिती माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी दिली.

सर्व नियुक्त कर्मचाऱ्यांना सोमवार, २७ मे रोजी नियोजन भवन येथे पहिले तर ३ जून रोजी दुसरे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विधानसभानिहाय १४ टेबलवरून मतमोजणी होणार असून साधारण २४ ते २७ फेऱ्या होतील. एका फेरीसाठी अंदाजे ३५ ते ४० मिनिटे इतका वेळ लागणार आहे. तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील रॅन्डमली पाच मतदान केंद्रावरील व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांचीही मोजणी केली जाणार आहे.

पोस्टल ४ हजार ८४४ पैकी आतापर्यंत २ हजार ८१ इतकी पोस्टल



मते प्राप्त झाली आहेत. संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून रुपाली ठाकूर यांची निगराणी राहणार आहे. याशिवाय मतमोजणी निरीक्षक म्हणून नारय्याचंद्र बिश्वास यांची नियुक्ती झाली असून तेही मतमोजणीदिवशी मोजणी केंद्रात उपस्थित असणार आहेत, असेही सिंह यांनी सांगितले.

# सी. बी. खेडगी कॉलेजचा बारावी निकाल ९२.५९ टक्के

**अक्कलकोट/प्रतिनिधीः**

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा निकाल ९२.५९ टक्के लागला आहे. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या + २ व्यवसाय शिक्षण विभागाचा निकाल १०० टक्के इतका लागला आहे. यामधील अकाऊंटींग अॅन्ड ऑफिस मॅनेजमेंटमधील विद्यार्थिनी साक्षी पवार ही ८९.१७ टक्के गुण घेऊन प्रथम आली. यंदाच्यावर्षी बारावी परीक्षेसाठी एकूण ७१६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ६६३ विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये ४५ विशेष श्रेणीत, ४३८ प्रथम श्रेणीत, १७४ द्वितीय श्रेणीत आणि तृतीय श्रेणीत ६ विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा निकाल ९८.३३ टक्के, कला शाखेचा ८०.९५ टक्के,

वाणिज्य शाखेचा ९५.२० टक्के आणि व्यवसाय शिक्षण विभागाचा १०० टक्के इतका लागला आहे. विज्ञान विभागातून प्रणाली खराडे (कॉम्प्युटर सायन्स) ८६ टक्के गुण घेऊन प्रथम, स्वाती जवळगे ८३.८३ टक्के- द्वितीय, तर संकल्प बुक्कानुरे हा ८३.३३ टक्के गुण घेऊन तृतीय आला. कला विभागातून दिव्या दसाडे ८३.१७ टक्के (प्रथम), दर्शन चव्हाण ८२.६७ टक्के (द्वितीय), श्वेता हरवाळकर ८२ टक्के (तृतीय) क्रमांकाने उत्तीर्ण झाले. वाणिज्य विभागातून संस्कृती शिंदे ८४.०५ टक्के (प्रथम), सपना वरवटे ८३.३३ टक्के (द्वितीय), संस्कृती सुतार ८२.३३ टक्के (तृतीय) क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. व्यवसाय शिक्षणात इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजीमध्ये साहिल शेख ७६ टक्के (प्रथम), शुभम टोणपे ७०.६७ टक्के (द्वितीय), मेघराज जेवरगी ७० टक्के (तृतीय) क्रमांकाने उत्तीर्ण ऑटोमोबाइल्स डी टेक्नॉलॉजीमध्ये अमरीश सोनकर ६१.८३ टक्के (प्रथम), समर्थ पुजारी ६० टक्के

(द्वितीय), बिरप्पा धनगर ५८.८३ टक्के (तृतीय) क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. अकाऊंटींग अॅन्ड ऑफिस मॅनेजमेंटमध्ये साक्षी पवार ८९.१७ टक्के (प्रथम), राधिका आलोणे ८५.८३ टक्के (द्वितीय), जयश्री बन्ने ८३.८३ टक्के (तृतीय) क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

# नामदेव रायते यांचे निधन



निफाड : निफाड तालुक्यातील खडक माळेगाव येथील प्रगतशील शेतकरी नामदेव (बाळासाहेब) लक्ष्मण रायते यांचे आज वयाच्या ५१ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले त्यांच्या पश्र्चात आई पत्नी एक मुलगी व दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने रायते परिवाराबरोबरच खडक माळेगाव या गावात शोक ळा पसरली.आहे

खडक माळेगाव येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार.. करण्यात आले ..यावेळी राजकीय सामाजिक धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते